महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग
प्रकाशगंगा प्लॉट नं.सी-१९, ई-ब्लॉक, ४ था मजला, बांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१

क्र.महापारेषण/मासं/का.औ.सं.क.क.वि/**२०३३** दिनांक: **१८ मार्च २०१९**

## परिपत्रक

**विषय :** जगभरात पसरणाऱ्या COVID-१९ विषाणू रोगाचा प्रसार टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत.

जगभरात पसरणाऱ्या COVID-१९ विषाणूचा प्रादुर्भाव महाराष्ट्रात गेल्या काही दिवसात वाढत चालला आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक योजना लागू केल्या आहेत. या दृष्टीने शासनाने सदर विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ ची अंमलबजावणी दि. १३ मार्च, २०२० च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र राज्याकरीता लागू केली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्र. एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४ दि. १६.०३.२०२० अन्वये करीता विषाणू रोगाचा प्रसार टाळण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी कंपनीमार्फत खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ लागू करणे आवश्यक आहे. सबब, सक्षम अधिकारी यांनी खालील सूचना निर्गमित करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

अ) जे कर्मचारी सार्वजनिक वाहनांच्या माध्यमातून कार्यालयात येतात त्यांनी स्वच्छतेची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. अशा कर्मचाऱ्याने कार्यालयात आल्यावर पहिले हात, वैयक्तिक स्वच्छता करुन कामाला सुरुवात करणे.

ब) कार्यालय, परिसर, उपहारगृह, जिने, उद्वाहक तसेच स्वच्छतागृहे आणि कंपनी वसाहत येथील साफसफाई बाबत प्राध्यान्याने लक्ष देऊन स्वच्छता अबाधित राहील याची खबरदारी घ्यावी. तसेच जंतुनाशक फवारणी करुन घ्यावी.

क) जे कर्मचारी स्वत: अथवा कर्मचाऱ्यासोबत राहणारी कुटुंबातील कोणतीही व्यक्ती सन २०२० मध्ये परदेशातून जावून आली असल्यास अथवा परदेशातून कोणी घरी आले असल्यास त्याबाबतीत तपशिलवार माहिती जसे नाव, पत्ता, देशाचे नाव, व वास्तव्याचा कालावधी आपल्या नियंत्रण अधिकाऱ्याकडे सादर करतील.

ड) कर्मचारी संघटनामार्फत कोणत्याही प्रकारची द्वारसभा, धरणे इत्यादी प्रकारच्या आंदोलनाची माहिती प्राप्त होताच तातडीने संबंधीत संघटनेस अशा प्रकारच्या आंदोलनापासून परावृत्त करण्यात यावे. तसेच कर्मचारी संघटनांमार्फत सदर परिपत्रकास प्रसिध्दी देऊन सर्व कर्मचाऱ्यांमार्फत या सूचना पोहोचतील याची व्यवस्था करावी.

इ) अधिकारी / कर्मचारी यांनी जमाव होईल अशा पध्दतीने एकत्र येणे टाळावे.

सक्षम अधिकारी यांनी खबरदारी म्हणून परिस्थितीजन्य आवश्यक वाटतील अशा उपाययोजना (उदा. थर्मोस्कॅनर, सॅनिटायझर, हँडवॉश, मास्क इत्यादी) त्यांच्या स्तरावर कराव्यात. तसेच उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे. तरीही याबाबत महाराष्ट्र शासनाने यानंतर काही महत्वाच्या सूचना किंवा प्रतिबंधात्मक उपाय प्रसारित केल्यास स्थानिक शासकीय यंत्रणेच्या संपर्कात राहून आपल्या स्तरावरील आणखी उपाययोजना कराव्यात.

(अनंत पाटील)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी